**ठळक बातम्या**

- कांदा प्रश्नी केंद्र सरकारसोबत सकारात्मक चर्चा झाली असून हमीभावाबद्दल दहा दिवसांत तोडगा निघेल अशी मुख्यमंत्र्यांची ग्वाही
- सार्वजनिक शिधावाटपासाठी राज्यांना निधी देणारी सार्थक योजना १६व्या वित्त आयोगाच्या कालावधीत पुढं राबवायला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी
- पंढरपूर वारी आणि अतिवृष्टीच्या कालावधीत राज्यात SIR राबवू नये अशी प्रदेश काँग्रेसची मागणी
- देशाचे पहिले प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या पुण्यतिथीनिमित्त देशाची आदरांजली

**आणि**

- नीट पेपरफुटीप्रकरणी सीबीआयकडून पुणे आणि लातूर इथून आणखी दोघांना अटक

**<><><><><><>**

कांदा प्रश्नी केंद्र सरकारसोबत सकारात्मक चर्चा झाली असून हमीभावाबद्दल येत्या दहा दिवसांत तोडगा निघेल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सांगितलं. केंद्रीय गृहमंत्री आणि सहकार मंत्री अमित शहा  यांच्या उपस्थितीत कांदा प्रश्नासहीत विविध प्रश्नांबाबत आज नवी दिल्लीत बैठक झाली, त्यानंतर मुख्यमंत्री वार्ताहरांशी बोलत होते. कांद्याचे दर स्थिर राहावे याकरता उपाययोजना सुचवल्या आहेत, याबाबत केंद्र सरकार सकारात्मक आहे, कांद्याचा हमीभाव १ हजार ५८० प्रति क्विंटल करण्याचा निर्णय काल झाला, भाव अजून वाढवण्याची मागणी केली असल्याचं त्यांनी सांगितलं. नाफेड आणि एन सी सी एफ नं कांद्याची २ लाखाऐवजी दहा लाख टन खरेदी करणं तसंच अतिरिक्त निर्यात कर लावण्याच्या मागणीबाबतही केंद्र सरकार सकारात्मक आहे, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं…

**होल्ड बाईट मुख्यमंत्री (२१ सेकंद)**

कांद्याची खरेदी तातडीनं सुरू करावी आणि कांद्यासाठी स्थिर आणि दीर्घकालीन धोरण आखावं अशी मागणी केंद्र सरकारकडे केल्याचं मंत्री छगन भुजबळ यांनी सांगितलं.

या बैठकीला केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान, केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी तसंच राज्यातून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, गिरीश महाजन उपस्थित होते.

**<><><><><><>**

सार्वजनिक शिधावाटपासाठी राज्यांना निधी देणारी सार्थक पीडीएस योजना १६व्या वित्त आयोगाच्या कालावधीत पुढे राबवण्याला केंद्रीय मंत्रिमंडळानं मंजुरी दिली आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज नवी दिल्लीत मंत्रिमंडळ बैठकीनंतर वार्ताहरांना ही माहिती दिली. या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी २५ हजार ५३० कोटी रुपयांची तरतूद करण्याचा प्रस्तावही आजच्या बैठकीत मंजूर झाला.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्यानं, सार्थक पीडीएस मधे ३ प्रणाली विकसित केल्या आहेत, असं त्यांनी सांगितलं. लाभार्थ्यांची नोंदणी सांभाळण्यासाठी 'निर्मल', तर तक्रारींवर दाद मागण्यासाठी 'आशा' ही बहुभाषक प्रणाली तयार केली आहे. वितरण व्यवस्थेतल्या मालाची वाहतूक करणारे ट्रक किंवा इतर वाहनांची हालचाल, 'सक्षम' या प्रणालीत टिपली जाते.

या योजनेअंतर्गत राज्यसरकारांना निधी देताना लागू होणाऱ्या नियमातही सुधारणा केली आहे. त्यात आंतरराज्य वाहतुकीचा खर्च, शिधावाटप दुकानदारांचा नफा इत्यादींचा समावेश आहे.

**<><><><><><>**

पंढरपूर वारी आणि अतिवृष्टीच्या कालावधीत SIR, अर्थात  मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम राबवू नका, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

SIR चा दुसरा टप्पा ३० जून ते २९ जुलै दरम्यान होणार आहे. याच कालावधीमध्ये आषाढी वारी असून राज्यातले लाखो वारकरी त्यात सहभागी होत असल्यानं या काळात ते गावाबाहेर असतील, त्यामुळे त्यांची नावं वगळली जाण्याची भीती आहे. तसंच जुलै महिन्यात महामुंबई परिसर, कोकण, पुणे, सातारा भागात अतिवृष्टीचा अंदाज हवामान खात्यानं दिला आहे. या सर्वांचा विचार करुन एसआयआर कार्यक्रम महिनाभर पुढे ढकलावा, असं सपकाळ यांनी राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी चोकलिंगम यांना लिहिलेल्या पत्रात केली आहे.

**<><><><><><>**

राज्यातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांमधून विधान परिषदेवर निवडून द्यायच्या १६, आणि नागपूरच्या एका जागेसाठीची पोटनिवडणूक, अशा सर्व १७ जागा महाविकास आघाडी लढवणार आहे. यासाठी जागावाटपाची प्राथमिक चर्चा आज टिळक भवनमध्ये झाली. दोन दिवसात पुन्हा एक बैठक घेऊ आणि सर्वसंमतीनं जागा वाटपाचा निर्णय जाहीर करु, असं काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी बैठकीनंतर बातमीदारांशी बोलताना सांगितलं. मविआमध्ये जागा वाटपावरून कोणताही विसंवाद अथवा तिढा नाही, तर सुसंवाद आहे, मात्र सत्ताधारी महायुतीत जागा वाटपावरून धुसफुस सुरु आहे, असं ते म्हणाले.

आजच्या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, खासदार सुप्रिया सुळे, शिवसेनेचे नेते आमदार अनिल परब, अंबादास दानवे, मिलिंद नार्वेकरही उपस्थित होते.

**<><><><><><>**

राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी बकरी ईदनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. हा सण त्याग, करुणा आणि परोपकाराचा संदेश देतो, असं त्यांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

बकरी ईदच्या निमित्तानं, महाराष्ट्र प्राणी संवर्धन (सुधारित) १९९५ कायद्याचं काटेकोर पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. महापालिकेनं अधिकृत केलेल्या कत्तलखान्यांमध्येच शासनानं परवानगी दिलेल्या जनावरांची कुर्बानी करण्याचे निर्देशही प्रशासनानं दिले आहेत.

बकरी ईद निमित्त राज्यात उद्या सार्वत्रिक सुट्टी जाहीर झाली असून, मुंबई शेअर बाजार आणि राष्ट्रीय शेअर बाजारही बंद राहतील.

**<><><><><><>**

देशाचे पहिले प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना आज आदराजंली वाहण्यात येत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशातून नेहरू यांना आदरांजली वाहिली.

नवी दिल्लीत शांतिवन इथं पंडित नेहरूंच्या समाधीस्थळी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी तसंच इतर अनेक नेत्यांनी पुष्पांजली अर्पित केली. लोकसभेचे सभापती ओम बिरला यांनी देखील प्रथम प्रधानमंत्र्यांना आदरांजली वाहिली आहे.

**<><><><><><>**

नीट पेपरफुटीप्रकरणी सीबीआयनं आज पुणे आणि लातूर इथून आणखी दोघांना अटक केली. डॉ. मनोज शिरूरे आणि तेजस शाह अशी त्यांची नावं आहेत. मनोज शिरूरे यानं तीन विद्यार्थ्यांना रसायनशास्त्राच्या पेपरमधले प्रश्न पुरवले, तर तेजस शाह यानं मनिषा हवालदारकडून भौतिकशास्त्राचा पेपर घेतल्याचा त्यांच्यावर संशय आहे. या प्रकरणात सीबीआयनं आतापर्यंत दिल्ली, जयपूर, गुरूग्राम, नाशिक, पुणे, लातूर आणि अहिल्यानगर इथून १३ जणांना अटक केली आहे.

<><><><><><>

गेल्या वर्षीच्या MH-CET परीक्षेबाबत उच्चस्तरीय चौकशीची मागणी प्रदेश काँग्रेसनं केली आहे. कृषी, अभियांत्रिकी, औषध निर्माण यांसारख्या व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेतल्या जाणाऱ्या या परीक्षेत गेल्या वर्षी मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाले, असा आरोप प्रदेश काँग्रेसच्या प्रवक्त्यानं आज मुंबईत केल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे. दहावी-बारावीच्या परीक्षेत कमी गुण मिळालेल्या अनेक विद्यार्थ्यांना या परीक्षेत १०० किंवा त्यांच्या जवळपास पर्सेंटाईल मिळाल्याचा दावा या प्रवक्त्यानं केला.

<><><><><><>

आंतरराष्ट्रीय योग दिनाचा मुख्य कार्यक्रम यंदा कोलकाता इथं होणार आहे. केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज योगदिनापूर्वी खजुराहो इथं आयोजित कार्यक्रमात ही माहिती दिली. “निरोगी वयोवृद्धीसाठी योग” ही यंदाच्या योग दिनाची संकल्पना असल्याचं त्यांनी सांगितलं. निरोगी आणि आजारमुक्त वृद्धत्वासाठी, योग दैनंदिन जीवनाचा भाग बनवण्याचं आवाहन जाधव यांनी केलं. यावेळी योग पार्क उपक्रम, ‘योग संगम’ पोर्टल आणि योग दिवसानिमित्त नव्या टी-शर्ट डिझाइनचंही अनावरण करण्यात आलं.

<><><><><><>

SIR अर्थात मतदारयाद्यांच्या सखोल पुनरीक्षणाच्या प्रक्रियेच्या  वैधतेवर, सर्वोच्च न्यायालयानं आज शिक्कामोर्तब केलं.

गेल्यावर्षी बिहारमधे पुनरीक्षण प्रक्रिया राबवण्यासाठी काढलेल्या अधिसूचनेला आव्हान देणाऱ्या  याचिकेवर, आज सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली, त्यावेळी न्यायालयानं हा निर्णय दिला. जन प्रतिनिधीत्व कायदा १९५० च्या कलम ३२४

नुसार निवडणूक आयोगाला पुनरीक्षण प्रक्रिया राबवण्याचा अधिकार आहे, याद्वारे राज्यघटनेच्या मूलभूत तत्त्वाचं पालन होतं, असं न्यायालयानं सांगितलं.

<><><><><>

सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष एकेरीच्या पहिल्या फेरीत भारताच्या एच एस प्रणोयनं, इंडोनेशियाच्या जोनाथन ख्रिस्तीवर १०-२१,२१-१२, २१-१८ अशी मात करत दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. जागतिक क्रमवारीत प्रणोय ३५, तर ख्रिस्ती ५ व्या स्थानावर आहेत.

पुरुष एकेरीच्या पहिल्या फेरीत आज दुसऱ्या एका सामन्यात, सिंगापूरच्या कीन यिव लोह कडून के श्रीकांत २२-२०, १९-२१, २१-१७ असा पराभूत झाला. लक्ष्य सेनचा सामनाही आज होत आहे. महिला एकेरीत मालविका बनसोडला तैवानच्या सियांग टीम कडून २१-,११ १९-२१, १२-२१ असा पराभव पत्करावा लागला.

मिश्र दुहेरीत, धृव कपिला-तनिषा क्रॅस्टो या जोडीनं मलेशियाई जोडीला तीन गेम्स मध्ये हरवत दुसरी फेरी गाठली आहे.

<><><><><>

गेल्या २४ तासात मराठवाड्यात तुरळक ठिकाणी गारपीट झाली तर कोकण, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडला.

येत्या दोन दिवसात राज्याच्या चारही विभागांमध्ये तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

//<><><><><>//